# वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

## प्राचार्य डॉ. खताळ यांचे प्रतिपादन




देगलूर : प्रतिनिधी

**एकविसाव्या शतकात माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये मानवाने नेत्रदिपक क्रांती केली तरी मोबाईलच्या अतीवापराचा नकारात्मक परिणाम वाचन संस्कृतीवर पडत आहे. वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देन्यासाठी शाळा, महाविद्यालय व वाचनालय या सर्व घटकानी सामूहिक प्रयत्न प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यॉंनी केले आहे.**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग आणि महाराष्ट्र शासनाद्वारे ₹अ₹ दर्जा मान्यताप्राप्त श्री समर्थ वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे , विद्यार्थी व वाचक व सामान्य नागरिक या वर्गामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचन संस्कृतीला अधिक बळ प्राप्त व्हावे या उद्देशाने आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री समर्थ वाचनालयाचे प्र. अध्यक्ष सूर्यकांत नारलावार होते. व्यासपीठावर श्री समर्थ वाचनालयाचे सचिव अविनाशराव देशपांडे व कोषाध्यक्ष देवेंद्र मोतेवार उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद बेंगलोर यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार दोन ग्रंथालयात सहयोगात्मक करार करण्यात आला.

याप्रसंगी देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग आणि श्री समर्थ वाचनालय यांच्या संयुक्त विद्यामाने भविष्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यासाठी एक कृती आराखडा तयार करण्यात आला आणि भविष्य काळामध्ये वाचन प्रेरणा दिन, ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. रंगनाथन यांची जयंती , भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १८ तास अभ्यास उपक्रम, दुर्मिळ ग्रंथाची देवान घेवान, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्य विविध उपक्रम संयुक्तपणे आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आला .

यावेळी मार्गदर्शन करताना श्री देवेंद्र मोतेवार असे म्हणाले की विद्यार्थी व वाचक वर्गामध्ये वाचनाची अधिक आवड निर्माण व्हावी या उद्देशाने दोन्ही ग्रंथालये एकत्रितपणे विविध उपक्रम राबवतील .

श्री समर्थ वाचनालयाचे सचिव अविनाशराव देशपांडे हे असे म्हणाले की माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात वाचन संस्कृतीला प्रेरणा देण्यासाठी देगलूर महाविद्यालयाचे पाठबळ श्री समर्थ वाचनालयाला मिळणे ही अत्यंत महत्त्वपूर्ण बाब आहे व या शक्तीद्वारे भविष्यात समाजात वाचन संस्कृती विकसित करन्यासाठी जनजागृतीपर विविध कार्यक्रम आयोजित केले जातील. याप्रसंगी देगलूर महाविद्यालयातील आयक्यूएससी समन्वयक डॉ. लक्ष्मण कुमार सुदाम , लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. बी आर कतुरवार, महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. साईनाथ शिंदे तसेच समर्थ वाचनालयाचे ग्रंथपाल पुंडलिक कदम कार्यक्रम यशस्वी करन्यासाठी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner